**<u>नि. फौ. खटला क्र.४७/२०२०</u>**
**<u>निशाणी क्र. (६२)</u>**

**<u>:: अभियोग पक्षातर्फे सा.क्र.०१ चा पुरावा ::</u>**
**<u>शपथेवर सत्य निवेदन करते की,</u>**

**माझे नांव** : लक्ष्मीबाई चंद्रकांत कुंभार,

**वय** : ६५ वर्षे, **धंदा** : कुंभार काम,

**राहणार** : लासोना, ता. देवणी, जि. लातूर.

**:: अभियोग पक्षातर्फे सरतपासणी साहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एस.एम. हाशमी यांचेमार्फत ::**

०१. घटना पाच वर्षापूर्वी १३ तारखेला उन्हाळ्यामध्ये सकाळी ११.०० वाजता माझ्या घरापुढे घडली होती. आरोपीच्या घरातील सांडपाणी माझ्या वाड्यात सोडले होते. त्यामुळे आरोपी क्र.१ ते ४ धिंगाणा घालत होते. आरोपी नागनाथने दगडाने माझ्या नाकावर मारले. आरोपींनी तेथे धिंगाणा केला आणि माझ्या पतीच्या पाठीवर बुक्क्या मारल्या. माझा मुलगा तेथे होता. त्याला काहीही दुखापत झाली नव्हती. त्यानंतर आम्ही पोलीस ठाण्यामध्ये गेलो आणि घटनेची खबर दिली. आता मला जबाब वजा खबर दाखविली. ती तीच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यामधील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी ६३** देण्यात येते. आरोपी न्यायालयामध्ये हजर नाहीत. मी त्यांना ओळखते. (अर्ज निशाणी ६० वरील आदेशाप्रमाणे त्यांची हजेरी माफ केलेली आहे.)

सरतपास पूर्ण.

**:: आरोपी करिता विधीज्ञ श्री. एम.बी. बिरादार यांनी अर्ज निशाणी ६१ प्रमाणे उलटतपास तहकूब केला. ::**

श्रवणोत्तर स्वीकृत | सा.वा.दा.ख.व.ब.अ.क.केले.

( श.अ. सुरजुसे ) | ( श.अ. सुरजुसे )
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, **दे व णी**. | न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, **दे व णी**.

दि. ०८/०८/२०२५.